R.No. MHHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ४०

दि. २१ जानेवारी २०२६, वार :बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## लातूर शहर महापालिकेत मुस्लीम समाजाचे सर्वाधिक १५ नगरसेवक.बौद्ध समाजाचे १२, मराठा ११ नगरसेवक निवडून

लातूर : लातूर महानगरपालिका निवडणुकीची मतमोजणी मंगळवारी पूर्ण झाली असून एकूण ७० नगरसेवक निवडून आले आहेत. या निवडणुकीत मुस्लीम समाजाचे सर्वाधिक १५ नगरसेवक विजयी झाले आहेत. त्याखालोखाल बौद्ध समाजाचे १२ नगरसेवक निवडून आले असून, मराठा समाजाचे ११ नगरसेवक महापालिकेत पोहोचले आहेत.

लातूर शहरात विविध समाजांचे नागरिक वास्तव्यास असून ही निवडणूक बहुरंगी आणि बहुचर्चित ठरली. प्रत्येक समाजाला प्रतिनिधित्व मिळावे, या दृष्टीने विविध राजकीय पक्षांनी सामाजिक समीकरणांचा विचार करून उमेदवार दिल्याचे चित्र दिसून आले. संबंधित प्रभागांतील मतदारसंख्या आणि सामाजिक रचना लक्षात घेऊन उमेदवारी निश्चित करण्यात आल्याचेही स्पष्ट झाले.

निवडणूक निकालानुसार लिंगायत समाजाचे ८, यलम समाजाचे ७, धनगर समाजाचे ६ नगरसेवक निवडून आले आहेत. तसेच मातंग, धोबी आणि कोळी समाजाचे प्रत्येकी २ नगरसेवक विजयी झाले आहेत. अग्रवाल, भावसार, वडार, ब्राम्हण आणि मारवाडी समाजाला प्रत्येकी एक नगरसेवक प्रतिनिधित्वाची संधी मिळाली आहे.

दरम्यान, बौद्ध समाजातून विविध पक्षांतून निवडून आलेल्या १२ नगरसेवकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. वंचित बहुजन आघाडी, काँग्रेस आणि भाजप या पक्षांतून बौद्ध समाजाचे उमेदवार विजयी झाले असून ही बाब सामाजिक प्रतिनिधित्वाच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे.

शहरातील अनेक समाजांना यंदाच्या निवडणुकीत अपेक्षित प्रतिनिधित्व मिळाले नसले, तरी महापालिकेतील नवे सभागृह सामाजिक समतोल दर्शवणारे ठरले आहे. आगामी काळात सर्व नगरसेवकांनी पक्षभेद बाजूला ठेवून शहराच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## महिलांना सुद्धा बौद्ध विधी लावण्यासाठी श्रामणेरी बौद्धाचार्या करून खऱ्या अर्थाने संविधानानुसार समतेची अंमलबजावणी (भा.बौ.महासभा) क्रांतिकारी कार्य करीत आहे- ड. एस. के. भंडारे.

नवी मुंबई / के. एच. हनवते :- भारतीय संविधानाने स्वातीताई शिंदे अध्यक्षा , महाराष्ट्र राज्य महिला शाखा






देशातील मनुस्मृतीचे विषमता नष्ट करून स्त्री पुरुष समानता आणली परंतु स्त्रियांना काही बाबतीत पुरुषाबरोबरचे जबाबदारी, काम दिले जात नाही मात्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या भारतीय बौद्ध महासभा या संस्थेच्या माध्यमातून डॉ.भीमराव य आंबेडकर यांच्या मार्गदर्शनात पुरुष आणि महिला राज्य आणि जिल्हा कार्यकारिण्या १५ऑगस्ट २०२३ पासून स्वतंत्र करण्यात आल्या, त्यानंतर महिलांच्या मागणीनुसार महिलांना श्रामणेरी - बौद्धाचार्या करून बौद्ध चे विधी संस्कार करण्याचे अधिकार देण्यासाठी चैत्यभूमीमधे दोन विशेष श्रामणेरी - बौद्धाचार्या प्रशिक्षण शिबिर घेण्यात आल्याची माहिती देऊन आता नवी मुंबई महिला जिल्हा शाखेच्या प्रथम वर्धापनानिमित्त भारतीय बौद्ध महासभेचे तिसरे श्रामणेरी - बौद्धाचार्या प्रशिक्षण शिबिर आम्ही राबवित आहोत त्यामुळे समाजात खऱ्या अर्थाने संविधानानुसार समतेची अंमलबजावणी करीत आहोत, तथागत बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेनुसार दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा) द्वारे समाजात सामाजिक समानता प्रस्थापित करण्यास सुरुवात झालेली आहे असे प्रतिपादन भारतीय बौध्द महासभेचे ट्रूस्टी राष्ट्रीय उपाध्यक्ष व केंद्रिय कार्यालय प्रमुख ड . एस. के. भंडारे यांनी दिनांक: १७/०१/२०२६ रोजी बुद्ध प्रतिष्ठाण वाशी नवी मुंबई येथे

श्रामणेरी - बौद्धाचार्या धम्म प्रशिक्षण शिबीर व उपासिका शिबिर उद्घाटन प्रसंगी केले.ड एस. के. भंडारे यांनी प्रभावशाली उदाहरणासह मार्गदर्शन करून सर्वांमध्ये उत्साह निर्माण करून महिलांमध्ये भरीव उर्जा निर्माण केली. तसेच डॉ हर्षवर्धन यांनी बुद्ध प्रतिष्ठान मार्फत चालवण्यात येणारे विविध उपक्रम यांची माहिती व पाहणी केल्यावर ड भंडारे यांनी समाधान व्यक्त करून प्रतिष्ठान च्या सर्वांचे अभिनंदन केले. उद्घाटन प्रसंगी सुषमाताई पवार (राष्ट्रीय उपाध्यक्षा व केंद्रिय महिला विभाग प्रमुख ) यांनी शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या सर्व महिलांचे व त्यांच्या परिवाराचे कौतुक केले.तसेच रागिणीताई पवार ( केंद्रिय महिला विभाग उप प्रमुख ) यांनी शुभेच्छा पर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवी मुंबई जिल्हा महिला शाखेच्या अध्यक्ष शोभाताई कांबळे होत्या, डॉ . अनंत हर्षवर्धन (बुद्ध प्रतिष्ठान अध्यक्ष),

सुजाताताई कांबळे ( सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य महिला शाखा ) स्वातीताई गायकवाड (संस्कार उपाध्यक्षा महाराष्ट्र राज्य ) नामदेव जगताप, ( जिल्हाध्यक्ष ,नवी मुंबई ) संजय झनके (सरचिटणीस ) छायाताई दिवे ( कोषाध्यक्षा , महिला जिल्हा शाखा ), वंदनाताई कुरणे ( संस्कार उपाध्यक्षा, महिला जिल्हा शाखा ) विजय झनके (उपाध्यक्ष, जिल्हा पुरुष शाखा ) विनोद पाचपिंडे ( उपाध्यक्ष पर्यटन, नवी मुंबई जिल्हा ) चांदणीताई पाचपिंडे ( उपाध्यक्ष पर्यटन, महिला जिल्हा शाखा ) दत्ताश्रय हराळ ( जिल्हा , कार्यालयीन सचिव ) मधुकर हिवराळे ( उपाध्यक्ष, संरक्षण नवी मुंबई जिल्हा ), अनिल शिंदे ( मेजर ) इत्यादी उपस्थित होते . उपस्थित मान्यवरांचे नवी मुंबई जिल्हा महिला शाखेच्या वतीने स्वागत करण्यात आले. धनराज मनुरे ( सचिव संरक्षण ) यांनी भोजनाची शानदार व्यवस्था महाराष्ट्रातून नवी मुंबई जिल्ह्यासह नांदेड, पुणे, सातारा, कोल्हापूर, अहिल्यानगर, रायगड, पालघर, धुळे, नाशिक, यवतमाळ जळगाव या जिल्ह्यातून शिबिरात सहभागी झालेल्या ३३ शिबीरार्थीसाठी सुविधा उपलब्ध करून दिली. संघनायक पुज्य भिक्खुणी संयमित्रा थेरी यांनी शिरार्थींना श्रामणेरी प्रवज्जा दिली. नियम सांगितले. श्रामणेरी बौद्धाचार्या शिबीर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ज्योतीताई जाधव (सरचिटणीस, नवी मुंबई जिल्हा महिला शाखा ) यांनी केले . या कार्यक्रमासाठी वार्ड शाखेचे पदाधिकारी, केंद्रिय शिक्षक, केंद्रिय शिक्षिका,

बौद्धाचार्य बुद्ध प्रतिष्ठान येथील वार्ड शाखेच्या उपासक आणि उपासिका शिबीराचे शिबीरार्थी सुद्धा उपस्थित होते. मंगलमय वातावरणात श्रामणेरी बौद्धाचार्या शिबीर उद्घाटन सोहळा संपन्न झाला . नवी मुंबई जिल्हा महिला शाखेच्या अध्यक्षा शोभाताई कांबळे यांनी अध्यक्षीय विचार व्यक्त करून सहकार्य करणाऱ्या सर्वांचे उपस्थित मान्यवरांचे आभार मानुन शिबीर कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला

## मुख्यमंत्र्यांनी दावोसमधून अनुभवला भारतातील पहिल्या आंतरराष्ट्रीय सायकलिंग 'ग्रँड टूर'चा थरार

पुणे/दावोस, : महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी आणि भारतीय क्रीडा विश्वात नवा इतिहास घडवणारी 'बजाज पुणे ग्रँड टूर' या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेला आज सुरूवात झाली. देशातील ही पहिलीच आंतरराष्ट्रीय 'ग्रँड टूर' सायकल स्पर्धा असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस येथील आपल्या व्यस्त कार्यक्रमात वेळ काढून स्पर्धेचे थेट प्रक्षेपण पाहिले.




'बजाज पुणे ग्रँड टूर' ला जागतिक स्तरावर 'टूर डी फ्रान्स'सारख्या स्पर्धांना असलेली प्रतिष्ठा मिळली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दावोस येथील औद्योगिक परिषदेसाठी जाण्यापूर्वी शुभारंभ कार्यक्रमात जगभरातील सायकलपटूंचे स्वागत केले होते. दावोस येथे राज्याच्या औद्योगिक विकासासाठी विविध उद्योग संस्थांशी सामंजस्य करार करण्यात व्यस्त असतानाही त्यांनी महाराष्ट्र आणि पुण्याची आठवण ठेवली. राज्याच्या क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या या स्पर्धे चा आनंद घेण्यासाठी त्यांनी सोबत असलेल्या अधिकाऱ्यांच्या लॅपटॉपवर स्पर्धेतील थरार अनुभवला.

या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होत असतांना त्यांनी सायकलपटूंच्या कौशल्याचेही कौतुक केले. सायकलपटूंना पुण्यात मिळणारा प्रतिसाद, इथेले उत्सवाचे स्वरुप, सायकलपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी आलेली तरुणाई पाहून त्यांनी आनंद व्यक्त केला. ही स्पर्धा राज्यातील क्रीडा क्षेत्राला प्रेरक ठरेल आणि सायकलचे शहर ही पुण्याची जुनी ओळख नव्या रुपात पुढे येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसाठी गेले आहेत. दिवसभराच्या व्यस्त कार्यक्रमात दोन्ही देशातील वेळांचा फरक लक्षात घेवून त्यांनी स्पर्धेच्यावेळी थेट प्रक्षेपण पाहण्याची इच्छा व्यक्त केली. मुख्यमंत्री सचिवालयाच्या अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन, विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारसू यांनी देखील थेट प्रक्षेपण पाहताना स्पर्धेचा आनंद घेतला.

एका बाजूला महाराष्ट्रात हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक आणण्यासाठी विविध देशांतील उद्योगसमूहांसोबत सामंजस्य करार होत असताना, दुसऱ्या बाजूला राज्यातील क्रीडा क्षेत्रात घडणाऱ्या या ऐतिहासिक घडामोडीकडे दिलेले विशेष लक्ष क्रीडा क्षेत्राला निश्चितपणे प्रोत्साहन देणारे आहे. भारतामध्ये पहिल्यांदाच होत असलेल्या 'ग्रँड टूर' स्वरूपाच्या या स्पर्धेला जागतिक व्यासपीठावरून मिळालेली ही दाद क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे नियम, अत्याधुनिक आयोजन आणि विविध देशांतील नामवंत सायकलपटूंचा सहभाग यामुळे 'बजाज पुणे ग्रँड टूर'ने पुण्याला जागतिक सायकलिंगच्या नकाशावर ठळक स्थान मिळवून दिले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दावोससारख्या आंतरराष्ट्रीय मंचावरून या स्पर्धेचा थरार अनुभवणे, हे आयोजक, खेळाडू तसेच क्रीडाप्रेमींसाठी मोठे प्रोत्साहन ठरले असून, यामुळे महाराष्ट्रात क्रीडा संस्कृती अधिक बळकट होण्यास निश्चितच चालना मिळणार आहे.

## प्रा.रमेश सरवदे यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरवण्यात आले

अंबाजोगाई/प्रतिनिधी-१८जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता, आरंभ बँक्वेट हॉल परेल मुंबई येथे राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा २०२६ आयोजित करण्यात आला. समाजात ज्ञानाचा दीप प्रज्वलित करणाऱ्या व विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या शिक्षकाचा गौरव करण्याच्या उद्देशाने बी. द .चेंज फाउंडेशनच्या वतीने राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६




श्री रत्नेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे संगीत विभाग प्रमुख प्रा. रमेश ज्ञानोबा सरवदे यांना प्रदान करण्यात आला. सदरील सोहळ्याप्रसंगी इंडियन आर्मी मेंबर ऑफ पार्लमेंट चे ब्रिगेडियर सुधीरजी सावंत, कमिशनर ऑफ पोलीस श्रीमती रुक्मिणी गलांडे मॅडम ,कलर्स मराठी या चॅनलवरील तुझ्यात जीव रंगला या मालिकेतील अभिनेत्री निवेदिता पगार, महाराष्ट्र पोलीस मुंबई च्या श्रीमती संध्या निकम मॅडम, एक्झिक्युटिव्ह प्रेसिडेंट त्रिदल सैनिक संघ अँड सैनिक फेडरेशन नाशिकचे मा. श्री अरुणजी भंडारे, ब्युरो चीफ सुदर्शन न्युज महाराष्ट्राचे दीपकजी चव्हाण इत्यादी मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत प्रा. रमेश ज्ञानोबा सरवदे यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ हा पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. श्री. सोमेश्वर शिक्षण संस्था जिरेवाडी या संस्थेचे सचिव ड. गोपाळरावजी कांदे, संस्थेचे अध्यक्ष गोवर्धनराव कांदे आणि श्री. रत्नेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सतीशजी किलचे सर यांनी भरभरून कौतुक केले पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या या मिळालेल्या पुरस्कारांची सर्व स्तरावर कौतुक केले जात आहे.

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत जेम्स वॅट शास्त्रज्ञाची जयंती साजरी

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील कुंभेफळ येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा शाळेत जेम्स वॅट शास्त्रज्ञाची जयंती साजरी दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेत जेम्स वॅट यांच्या जयंतीनिमित्त



त्यांच्या प्रतिमेस प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ रामकिशन ग्यानबा मुळे सर व श्री संदीप मेघराज ठोंबरे सर यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची यांनी केले.जेम्स वॅट या शास्त्रज्ञाचा जन्म दि.१९ जानेवारी १७३६ मध्ये ग्रीनॅक स्कॉटलंडमध्ये झाला.त्यांनी वाफेच्या इंजिनमध्ये सुधारणा करून त्याची कार्यक्षमता आणि उपयोगिता वाढवली.त्यांच्या या सुधारणेमुळे वाफेच्या इजिनचा वापर कारखान्यांमध्ये, खाणींमध्ये व नंतर रेल्वेमध्ये मोठ्या प्रमाणावर होऊ लागला.त्यांच्या या शोधांनी आधुनिक युगातील औद्योगिक विकासाचा पाया रचला.त्यांनी लॅटिन, ग्रीक आणि गणित विषयांचे अध्ययन केले.त्यांनी चतुर्थ यंत्र, होकायंत्र आणि दाबमापक इत्यादी उपकरणे तयार केली.अशी माहिती या शाळेतील गणित, विज्ञान विषयाचे प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री संदीप मेघराज ठोंबरे सर यांनी दिली. डॉ.श्री.रामकिशन ग्यानबा मुळे सर, श्री आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम, श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम, श्री आकाश दत्तात्रय लोंढे सर, राहुल बजरंग बचुटे सर, ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम यांनीही सविस्तर माहिती दिली. सोमवार रोजी बालविवाह प्रतिबंधक शपथ घेण्यात आली व बालविवाह करु नये व त्याबाबत समुपदेशन करण्यात आले.या कार्यक्रमास श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक, डॉ रामकिशन ग्यानबा मुळे सर, श्री संदीप मेघराज ठोंबरे सर, श्री राहुल बजरंग बचुटे सर, श्री आकाश दत्तात्रय लोंढे सर, श्री आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम, श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम, ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम,पिएम पोषण आहार शक्ती निर्माण योजना कामगार स्वर्णमाला पवार व अनिता पवार, विद्यार्थी,विद्यार्थिनी, शिक्षणप्रेमी नागरिक अंगणवाडीताई, मदतनिस हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री राहुल बजरंग बचुटे सर यांनी केले व श्री आकाश दत्तात्रय लोंढे सर यांनी आभार मानले.

## संपादकीय...

# लातूर महापालिका : सत्तेच्या अहंकाराचा पराभव,लोकशाहीचा विजय

४३ + ४ हा आकडा नाही, तो विरोधकांवरचा ऐतिहासिक प्रहार आहे लातूर शहर महानगरपालिका निवडणूक हा केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेचा निकाल नाही. हा निकाल म्हणजे सत्तेच्या माजाला दिलेला जबरदस्त धक्का, मतदारांना गृहित धरणाऱ्या राजकारणावरचा थेट प्रहार आणि लोकशाहीच्या ताकदीचा जाहीरनामा आहे. काँग्रेसचे ४३ आणि वंचित बहुजन आघाडीचे ४ असे एकूण ४७ नगरसेवकांचे स्पष्ट बहुमत म्हणजे अपघात नव्हे, योगायोग नव्हेतो जनतेचा ठाम, स्पष्ट आणि संतप्त निर्णय आहे.

या निकालाच्या केंद्रस्थानी एक नाव ठळकपणे उभे राहतेअमित विलासराव देशमुख. सत्तेची मस्ती आणि लोकांपासून तुटलेले राजकारण या निवडणुकीत विरोधकांकडे काय कमी होते?

मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ, सत्तेची संपूर्ण यंत्रणा, जिल्ह्यातील आमदार, कोट्यवधींचा प्रचार, आक्रमक भाषणेसगळे काही होते. पण तरीही ते हरले. कारण त्यांच्या राजकारणात लोक नव्हते. त्यांच्या भाषणांत गर्जना होती, पण जमिनीवर विश्वास नव्हता. सत्तेचा माज होता, पण जनतेशी नातं तुटलेलं होतं.

२०१७ मध्ये ३६ नगरसेवक निवडून आणणारा गट यंदा थेट २२ वर आला. ही आकड्यांची घसरण नाहीही राजकीय दिवाळखोरीची कबुली आहे. सत्ता म्हणजे आपली मक्तेदारी, मतदार म्हणजे गृहित धरायचा घटक, आणि निवडणूक म्हणजे यंत्रणेचा खेळया भ्रमाचा लातूरने चुराडा केला.

दलितमुस्लिम समाजाला गृहित धरण्याची मोठी चूक विरोधकांची सर्वात मोठी चूक एकच होतीदलित आणि मुस्लिम समाजाला कमी लेखणे.

कधी दुर्लक्ष, कधी दडपशाही, कधी आक्रमक भाषा, तर कधी फक्त मतांसाठी आठवणहा दुटप्पीपणा जनतेने ओळखला. या समाजांनी पहिल्यांदाच फुटून नव्हे, तर संघटित होऊन उत्तर दिले.

वंचित बहुजन आघाडीसोबत युती करून अमित देशमुख यांनी जे पाऊल उचलले, ते केवळ राजकीय गणित नव्हतेते सामाजिक वास्तवाची जाणीव होते. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचित घटक आणि मुस्लिम समाज एकत्र आले आणि विरोधकांच्या सत्तेच्या किल्ल्यालाच सुरुंग लावला.

आक्रमकता होती, पण आशय नव्हता विरोधकांची आक्रमकता फक्त भाषणांपुरती मर्यादित होती. घोषणांचा मारा, भीती दाखवण्याचे प्रयत्न, जाती-धर्माचे राजकारणपण लोकांच्या प्रश्नांवर मौन. बेरोजगारी, महागाई, नागरी सुविधा, पाणी, आरोग्य, शिक्षणया प्रश्नांवर उत्तर नव्हते. लोकांनी हे ओळखले आणि मतपेटीतून निर्णय दिला.

अमित देशमुख : निवडणूक जिंकणारा नव्हे, राजकारण वळवणारा नेता हा विजय योगायोग नाही. अमित देशमुख यांनी निवडणूक लढवली नाहीती त्यांनी वळवली. प्रत्येक प्रभागातील सामाजिक रचना, मतदारांची मानसिकता, प्रतिनिधित्वाची अपेक्षा आणि भविष्यातील राजकीय दिशा यांचा अचूक अंदाज घेऊन ही रणनीती आखली गेली.

४३ + ४ म्हणजे सत्तेच्या अहंकारावर बसलेला चपराक

विरोधकांच्या राजकीय भ्रमाचा अंत आणि समावेशक राजकारणाचा स्पष्ट विजय हा निकाल इशारा नाही, तो धडा आहे

हा निकाल विरोधकांसाठी इशारा नाहीतो धडा आहे. जो समाजाला गृहित धरतो, जो लोकांशी संवाद तोडतो, जो सत्तेच्या जोरावर लोकशाही दाबण्याचा प्रयत्न करतोत्याला जनता सत्तेबाहेर ढकलते. लातूरने हे करून दाखवले.

आज लातूर महापालिकेवर काँग्रेसची सत्ता आहे. पण त्याहून मोठी बाब म्हणजे लोकशाहीची सत्ता पुन्हा प्रस्थापित झाली आहे. आता कसोटी आहेही सत्ता पारदर्शक कारभारात, समावेशक विकासात आणि सामाजिक न्यायात उतरते का?

कारण लातूरने स्पष्ट सांगितले आहे

आम्हाला सत्तेचा माज नको, आम्हाला विश्वासार्ह नेतृत्व हवे. आणि हा विश्वास आज अमित विलासराव देशमुख यांच्या हाती आहे.

# बहुजन राजकारण : पक्ष अनेक, पण दिशा कुठे?

भारतीय लोकशाहीत बहुजन समाज हा केवळ मतदारांचा समूह नाही, तर तो या देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय वास्तवाचा कणा आहे. संख्येने बहुसंख्य असूनही सत्ता, धोरणनिर्मिती आणि निर्णय प्रक्रियेत आजही बहुजन समाज दुय्यम स्थानावरच आहे. या विसंगतीतूनच बहुजन राजकारणाचा जन्म झाला; डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी त्याला दिशा दिली. मात्र आज, स्वातंत्र्याच्या सात दशकांनंतर प्रश्न असा उभा राहतो की, बहुजनांचे राजकारण खरोखर त्यांच्या हातात आहे का, की ते पक्षीय स्वार्थात अडकले आहे? आजच्या राजकीय पटावर -खचखच्, वंचित बहुजन आघाडी, रिपब्लिकन पक्षांचे विविध गट, बहुजन समाज पार्टी आणि इतर अनेक आंबेडकरी पक्ष अस्तित्वात आहेत. प्रत्येकजण स्वतःला बहुजनांचा खरा प्रतिनिधी म्हणवतो. पण बहुजन समाजाची अवस्था मात्र फारशी बदललेली दिसत नाही. मग दोष कुठे आहे? विचारात, नेतृत्वात, संघटनात की एकीच्या अभावात? -खचखच् ने अलिकडच्या काळात राष्ट्रीय राजकारणात लक्ष वेधून घेतले आहे. असदुद्दीन ओवैसी यांची आक्रमक, अभ्यासपूर्ण आणि निर्भीड संसद भूमिका अनेकांना भावते. अल्पसंख्याकांच्या प्रश्नांवर ते निर्भयपणे सरकारला जाब विचारतात, हे निर्विवाद आहे. मात्र महाराष्ट्रासह देशाच्या अनेक भागांत -खचखच् कडे पाहताना एक प्रश्न सतत उपस्थित राहतो, हा पक्ष बहुजनांचा आहे की मुख्यतः मुस्लिम समाजाचा? सामाजिक न्याय, जातिनिर्मूलन, आरक्षण, आर्थिक विषमता यासारख्या आंबेडकरी मुद्द्यावर -खचखच् ची भूमिका स्पष्ट असली, तरी त्याची प्रतिमा अजूनही संकुचित सामाजिक चौकटीत अडकलेली आहे. बहुजन एकीची भाषा बोलतानाही प्रत्यक्ष व्यवहारात ती एकी दिसून येत नाही. वंचित बहुजन आघाडीने महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळा वैचारिक सूर आणला. 'बहुजन' या संकल्पनेला व्यापक अर्थ देत दलित, आदिवासी, ओबीसी, भटके-विमुक्त, अल्पसंख्याक आणि वंचित घटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराज यांच्या विचारांचा संदर्भ देत वंचितने राजकीय चर्चेला वैचारिक खोली दिली. मात्र निवडणुकीच्या रणांगणात वंचितची ताकद तितकी प्रभावी ठरत नाही. नेतृत्वाभोवती केंद्रीकरण, स्थानिक पातळीवरील कमकुवत संघटन आणि सातत्याने अपयशी ठरणारे निवडणूक निकाल, या सगळ्यामुळे वंचितचा वैचारिक प्रभाव राजकीय सत्तेत रूपांतरित होत नाही. विचार असणे महत्त्वाचे असते, पण तो जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी मजबूत संघटन आणि व्यवहार्यता तितकीच गरजेची असते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेला रिपब्लिकन पक्ष हा आंबेडकरी चळवळीचा राजकीय वारसदार मानला जातो. मात्र आज रिपब्लिकन पक्ष ही एक संघटना नसून, गटांची गर्दी बनली आहे. प्रत्येक गट स्वतंत्रपणे सत्ताधारी पक्षांशी समझोते करतो, मंत्रीपदे मिळवतो, पण बहुजन समाजाच्या मूलभूत प्रश्नांवर ठोस लढा उभारताना दिसत नाही. यामुळे रिपब्लिकन पक्षांवर 'सत्तेचे उपग्रह' किंवा 'बी-टीम' अशी टीका होते. आंबेडकरांच्या नावाचा वापर करून वैयक्तिक राजकीय लाभ मिळवणे, हीच रिपब्लिकन चळवळीची ओळख बनल्याचे चित्र दुर्दैवाने निर्माण झाले आहे. वारसा मोठा असला, तरी तो सांभाळण्याची जबाबदारी अनेकांनी टाळली आहे. कांशीराम आणि मायावती यांच्या नेतृत्वाखाली बसपा ने 'बहुजन' या संकल्पनेला राष्ट्रीय राजकारणात प्रतिष्ठा मिळवून दिली. उत्तर प्रदेशात सत्ता मिळवण्याचा अनुभव हा भारतीय बहुजन चळवळीतील महत्त्वाचा टप्पा होता. मात्र महाराष्ट्रात बसपा जवळपास अप्रासंगिक ठरली आहे. स्थानिक नेतृत्वाचा अभाव, संघटनात्मक मरगळ आणि बदलत्या सामाजिक वास्तवाशी जुळवून न घेण्याची मानसिकता यामुळे बसपा महाराष्ट्रात प्रभाव पाडू शकलेली नाही. राष्ट्रीय पातळीवर मोठा विचार असला, तरी स्थानिक जमिनीवर रुजण्याची तयारी नसल्यास तो विचार केवळ घोषणांपुरता मर्यादित राहतो.

या सगळ्या पक्षांचे विश्लेषण केल्यावर एक गोष्ट स्पष्ट होते, कोणताही एक पक्ष पूर्णपणे सरस नाही. प्रत्येकाकडे काही बलस्थानं आहेत, तसंच गंभीर मर्यादाही आहेत. पण बहुजन समाजासाठी सर्वात घातक बाब म्हणजे या पक्षांमधील परस्पर स्पर्धा, अहंकार आणि अविश्र्वास. बहुजनांचे मत विभाजित राहिले, तर सत्तेची चावी नेहमीच इतरांच्या हातात राहणार. हे वास्तव वारंवार सिद्ध झाले आहे. तरीही इतिहासातून धडा घेण्याऐवजी बहुजन राजकारण आजही तुकड्यांत विभागलेले दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकारणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले होते. सत्ता ही अंतिम उद्दिष्ट नव्हती; ती साधन होती. आज मात्र बहुजन राजकारणात सत्ता हीच अंतिम ध्येय बनलेली दिसते. विचार, मूल्ये आणि दीर्घकालीन सामाजिक परिवर्तन याऐवजी तात्कालिक लाभ, पदे आणि निवडणुकीतील गणिते यांना प्राधान्य दिले जाते.

आज गरज आहे ती एका नव्या आत्मपरीक्षणाची. पक्ष बदलून प्रश्न सुटणार नाहीत, जोपर्यंत बहुजन एकी प्रामाणिकपणे घडत नाही, नेतृत्व वैयक्तिक स्वार्थापेक्षा चळवळीला प्राधान्य देत नाही आणि आंबेडकरवाद केवळ घोषणांपुरता न राहता कृतीत उतरत नाही. बहुजन समाजासाठी खरा प्रश्न 'कोणता पक्ष सरस?' हा नाही, तर 'बहुजन समाज स्वतः कधी सरस होणार?' हा आहे. जो दिवस बहुजन समाज आपले मत, आपली ताकद आणि आपली दिशा एकत्र करेल, त्या दिवशी कोणताही पक्ष सरस ठरेल, कारण सत्ता बहुजनांच्या हातात असेल. आज बहुजन समाजासमोर प्रश्न पक्षाचा नाही, भूमिकेचा आहे. नाव वेगवेगळी असू शकतात, झेंडे वेगवेगळे असू शकतात; पण शोषण एकच आहे, अन्याय एकच आहे आणि संघर्षाची गरजही एकच आहे. मतांची विभागणी करून कुणाचाच उद्धार झालेला नाही; उलट सत्तेचे दरवाजे नेहमीच इतरांसाठी खुले राहिले आहेत. बहुजन एक झाले, तर सत्ता त्यांच्या पायाशी येते आणि बहुजन फुटले, तर सत्ता कायमच दूर राहते.

**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९२९**

# सावधान!सोशल मीडियाचा वाढता वापर धोकादायक स्थितीत.

आजच्या परिस्थितीत सोशल मीडिया किंवा मोबाईल मानवी शरीरावर स्लोपॉयझनचे काम करीत असुन घणाघाती प्रहार करीत आहे व संपूर्ण दिनचर्येवर अंकुश लावत आहे.आज लहानांपासून तर मोठ्यांपर्यंत सर्रास सोशल मीडियाचा वाजवीपेक्षा जास्त वापर होतांना दिसत आहे.यामुळे लहान मुलांचे बालपण हिरावण्याचे मोबाईलसह सोशल मीडिया करीत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.जिथे गरज नाही तीथेही सोशल मीडियाचा वापर दिसून येतो.आज फक्त ऑस्ट्रेलिया, स्वीडनमध्येच नाही तर संपूर्ण जगात टिव्ही आणि मोबाईलच्या अती वापरामुळे म्हणजेच सोशल मीडियामुळे दुष्परिणामाला सुरूवात झाली आहे.कारण टीव्ही आणि मोबाइलने लहान मुलांसह संपूर्ण मानवजातीला कौटुंबिक नाते तोडून आपलेसे करून ठेवले आहेत. यामुळे लहान मुलांचे बालपण हिरावले आहे.टिव्हि आणि मोबाइलचा दुष्परिणाम लहान मुलांवर मोठ्या प्रमाणात होऊन पुढील आयुष्यासाठी धोका निर्माण करण्याचे चिन्ह स्पष्ट दिसत आहे. कारण यामुळे अनेक नवीन -नवीन आजार जन्म घेऊ शकतात आणि घेत आहे.आधुनिक काळात लहान मुले रडायला लागली की आई-वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला जातो आणि ही प्रथा जगातील अनेक देशांमध्ये आहे.याचा दुष्परिणाम स्वीडनमध्ये व ऑस्ट्रेलियामध्ये दिसायला लागला आहे. त्यामुळे आता स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही पाहण्यास बंदी घालण्यात आली आहे.तर ऑस्ट्रेलियामध्ये १६ वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्यात आली आहे.एका पाहणीनुसार १३ ते १६ वयोगटातील स्वीडिश किशोरवयीन मुले शाळेबाहेर पडल्यानंतर दररोज सरासरी साडेसहा तास मोबाइल, टीव्हीवर घालवत आहेत.८ तासांपेक्षा जास्त वेळ स्क्रीनवर अमेरिकेतील किशोरवयीन मुले घालवत आहेत. हीबाब भविष्यासाठी अत्यंत घातक आहे.देशांच्या आरोग्य संस्थेच्या मते मोबाईल आणि टिव्ही स्क्रीनचा वापर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करीत असल्याने लहान मुलांना डिजिटल मिडिया आणि टेलिव्हिजन पासुन पूर्णपणे दुर ठेवले पाहिजे. मोबाईल, टीव्हीच्या अतिवापरामुळे कौटुंबिक संवाद आणि शारीरिक व्यायाम बंद झाले आहे. आपण म्हणतो बालपण देगा देवा!परंतु आज आपले बालपण मोबाईल आणि टिव्हीने हिरावून घेतले आहे ही अत्यंत चिंताजनक आणि घातक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गांसाठी घातक सिद्ध होत.त्याचप्रमाणे शाळांमध्ये व ऑनलाईन शिक्षणप्रणालीमध्ये विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोरं येतांना दिसत आहे.एक वर्षांवरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात.याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे.याचेच प्रायश्र्चित्त आज स्वीडिश व ऑस्ट्रेलियन किशोरवयीन मुले भोगत आहेत.ही परिस्थिती फक्त स्वीडनमध्ये किंवा ऑस्ट्रेलियामध्येच नाही तर भारतासह संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते.यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने सुध्दा दिला आहे. देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे. सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात.स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारीक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसुन येते. आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही,घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही. कारण एक वर्षाच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटोनघंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या व टिव्हीच्या आहारी गेले आहेत.यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे. शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे.मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते.स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो.परिणामी,मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे.यामुळे मुलांमधील फिजिकल ऍक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी-कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही. त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात.म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही. डब्लुएचओच्या रिपोर्ट नुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल ऍक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे. म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाही किंवा शारीरिक हालचाली ज्या पध्दतीने पाहिजेत त्या पध्दतीने दिसून येत नाही.यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कीतीही हुशार असेल परंतु शारीरिक दृष्ट्या खालावत असल्याचे दिसून येते. देशातील ४५ टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून ऍक्टिव नसल्याचे दिसून येते. म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो.यामुळे शरिराला ज्या पध्दतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे. आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईल शिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा अती वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे याला कोणीही नाकारू शकत नाही. म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीव घेणा सीध्द होवू शकते यालाही नाकारता येत नाही.मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक) होण्याचे मोठे कारण ठरू शकते.स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा टॅक अथवा लकवा किंवा ब्रेन टॅक असेही म्हणतात.देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास ६५ लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते.म्हणजेच आजच्या घडीला मोबाईलच्या अती वापरामुळे मानवजाती अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याचे समजते.ही बाब स्पष्ट होते की मोबाईलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार ,मानेचा त्रास, मेंदूचा त्रास,हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील प्रत्येक अवयवांना पाहिजे त्याप्रमाणात व्यायाम मिळतच नाही. त्यामुळे ही कठीण परिस्थिती उध्दभवत आहे.मानवाला मोबाईलमुळे व टिव्हीमुळे जेवढा आनंद मिळतो त्यापेक्षा जास्त धोका आणि गंभीर परिणाम मोबाईल व टिव्हीच्या स्क्रीनमुळे होणाऱ्या आजारामुळे निर्माण होत आहे. त्यामुळे मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करता येईल व आपल्याला शारीरिक दृष्ट्या कोणताही धोका निर्माण होणार नाही यापध्दतीने मोबाईलचा वापर व्हायला हवा.अमेरिकन केडमी ऑफ पीडियाट्रिक्स या संस्थेने एका संशोधनात म्हटले आहे की दोन ते चार वर्षांच्या मुलांनी दिवसातून फार तर एक तास फोन वापरणे योग्य असल्याचे संशोधनात म्हटले आहे.चार वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांनी दररोज दोन तास मोबाईल वापरणे योग्य आहे.यापेक्षा जास्त मोबाईल वापरल्यास डोळ्यासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो यानंतर यांचे भयंकर परिणाम भोगावे लागू शकतात. आपण काय करायचं आणि काय करू नये हे आपणच ठरवू शकतो व धोकादायक वस्तू पासून दुर राहु शकतो.आज आपण पहातो की ३ ते २० वर्षे वयोगटातील मुले-मुली टीव्ही पहाताना, जेवतांना मोबाईलला चीपकुन रहातात. जनुकाय मोबाईल बीना जिवन अधुरे आहे की काय अशी परिस्थिती दिसून येते.याचा दुष्परिणाम पुढेचालुन भयानक होवू शकतो.छोटे मुलं रडायला लागले की आई- वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन मोकळे होतात परंतु हे घातक आहे.त्यामुळे पालकांना आग्रहाची विनंती करतो की मुलांना मोबाइल पासून जितके दुर ठेवता येईल तितके दुर ठेवलेच पाहिजे. यामुळे मुलांना फिजिकल ऍक्टीव्हीटी किंवा व्यायाम करण्यास मदत होईल.मोबाईलचा अती वापर शरिराला घातक आहेच त्याचबरोबर त्याचा गैरवापर केला तर जीवाला सुध्दा धोका निर्माण होऊ शकतो आणि होत आहे. आजही लोक वाहन चालवितांणा मोबाईलवर बोलत रहातात यामुळे अनेक दुर्घटना झाल्याचे आपण पहातो आणि यामुळे देशात मोठ्या प्रमाणात जीवीत हाणी सुध्दा झाल्या आहेत. मोबाइल वापरायला हरकत नाही.परंतु त्याचा योग्यवेळी आणि कमीत कमी वापर व्हायला पाहिजे. अन्याथा मोबाईलमुळे जेवढे सुख आणि आनंद मिळतो.त्यापेक्षा हजार पटीने आपल्याला यातना किंवा दु:ख भोगाव्या लागतील हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे मुलांनी मोबाईल हातात घेण्यापेक्षा पुस्तक, वर्तमानपत्र हातात घेतले तर बुध्दीचा विकास झपाट्याने होईल व पुस्तकी ज्ञानामुळे शरिराच्या विकासाला मोठी चालना मिळेल. आपण एकंदरीत विचार केला तर मोबाईल युगामुळे देशातील मातीतील छोटे-छोटे खेळ नामशेष झाले आहे किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे अनेक आजारांचा सामना आज करावा लागतो आहे.आजच्या युवापिढीला जुने खेळ काय होते ते सुद्धा माहिती नाही आणि या संपूर्ण गोष्टी सोशल मीडियामुळे उध्दभवतांना दिसते. म्हणजेच आजचे मोबाईल व सोशल मीडियाचे युग बालकांसाठी,युवा वर्गासाठी किंवा विद्यार्थांना शारिरीक दृष्ट्या अपंग करीत असल्याचे दिसून येते.यावरून असे लक्षात येते की वर्चुअल खेळांमुळे रियल खेळ हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.आज मोबाईलची दुनिया पहाता असे वाटते कहा गये ओ दिनस्वीडन ऑस्ट्रेलियामध्ये मोबाईल आणि टिव्हीचे लहान मुलांवर होत असलेले दुष्परिणाम पहाता स्वीडन सरकारने काही मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत.यावरून स्पष्ट होते की टीव्ही आणि मोबाइलने स्वीडनमध्ये भयावह रूप धारण केले आहे. त्यामुळे यापासून भारत सरकारने व देशातील संपूर्ण जनतेनी सावधगिरी बाळगली पाहिजे. ऑनलाइन बाल लैंगिक शोषणाशी संबंधित साहित्य असणारे यूआरएल अद्यापही सक्रिय आहेत हे रोखण्यासाठी सरकारने कठोर पाऊले उचलुन तातडीने नियंत्रण आणणे गरजेचे आहे.भारतात वाढता सोशल मीडियाचा वापर पहाता सरकारने ऑस्ट्रेलिया व स्वीडन सारखे कठोर नियमांची अंमलबजावणी केली पाहिजे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# स्मृतींचे राजकारण : शासन निर्णयातून वगळले गेलेले राष्ट्रपुरुष आणि अस्वस्थ करणारे वास्तव

लोकशाही ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नसून ती सामूहिक स्मृती, मूल्ये आणि परंपरा यांवर उभी असते. एखादा समाज कोणाला स्मरतो, कोणाला विसरतो आणि कोणाला जाणीवपूर्वक बाजूला सारतो, यावर त्या समाजाची वैचारिक दिशा ठरते. याच पार्श्वभूमीवर २०२६ मध्ये राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती यांच्या जयंती-पुण्यतिथी व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत काढण्यात आलेल्या शासन निर्णयातून जगतगुरू संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंती-पुण्यतिथी वगळल्या गेल्याची बाब केवळ प्रशासकीय नव्हे, तर गंभीर वैचारिक प्रश्न उपस्थित करणारी ठरते. हा निर्णय चुकून झाला आहे का? की तो एका ठराविक विचारसरणीचा सूचक आहे? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, संतपरंपरा आणि आधुनिक राष्ट्रनिर्मितीत योगदान देणाऱ्या नेत्यांना वगळणे हे कुठल्या भारताची कल्पना मांडते?

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज हे केवळ धार्मिक संत नव्हते; ते सामाजिक क्रांतिकारक व महाराष्ट्राच्या आत्म्याचे शिल्पकार होते. त्यांनी समाजाला भक्तीच्या नावाखाली पलायनवाद शिकवला नाही, तर समतेचा, विवेकाचा आणि मानवतेचा मार्ग दाखवला. ज्ञानेश्वरांनी अवघ्या तरुण वयात लिहिलेली ज्ञानेश्वरी ही ग्रंथरचना संस्कृतच्या मक्तेदारीला आव्हान देत मराठीला ज्ञानभाषा बनवणारी ठरली. विश्वचि माझे घर ही भूमिका मांडणारा हा संत आजही समावेशक भारताची संकल्पना सांगतो. संत तुकाराम महाराजांनी अभंगातून अन्याय, दांभिकता आणि सामाजिक विषमतेवर प्रहार केला. जाति कुळ धर्म नाही उरला असे सांगणाऱ्या तुकारामांचे विचार आजही समाजातील भिंती तोडणारे आहेत. अशा संतांना शासन निर्णयातून वगळणे म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक मुळांनाच दुय्यम ठरवण्यासारखे आहे. महाराष्ट्राची संतपरंपरा ही कर्मकांडप्रधान नव्हे, तर मानवकेंद्रित परंपरा आहे. संतपरंपरा म्हणजे श्रद्धा नव्हे, तर सामाजिक संविधान आहे. इथे देवापेक्षा माणूस महत्त्वाचा ठरतो. त्यामुळेच फुले-शाहू-आंबेडकर यांनी संतपरंपरेला सामाजिक परिवर्तनाचा पाया मानला. अशा परंपरेतील दोन प्रमुख स्तंभ, ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांची जयंती-पुण्यतिथी शासनाच्या अधिकृत यादीतून वगळली जाणे म्हणजे समतेच्या विचारधारेला बाजूला सारण्याचा संकेत आहे का, असा प्रश्न निर्माण होतो.

दुसरीकडे, माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती-पुण्यतिथी वगळली जाणेही तितकेच चिंताजनक आहे. राजीव गांधी हे कोणत्याही पक्षापुरते मर्यादित नेते नव्हते; ते आधुनिक भारताच्या तंत्रज्ञानात्मक आणि प्रशासकीय सुधारणांचे शिल्पकार होते. पंचायतराज व्यवस्था, १८ वर्षांवरील मताधिकार, संगणकीकरण, दूरसंचार क्रांती, तरुणांना राजकारणात संधी, या सगळ्या गोष्टींनी भारताला २१व्या शतकात प्रवेश करण्यासाठी तयार केले. आज डिजिटल इंडियाची भाषा बोलताना, त्याचे मूळ रोवणाऱ्या नेतृत्वाला विसरणे हा इतिहासाशी केलेला अन्याय ठरतो. कोणत्या व्यक्तींच्या जयंती-पुण्यतिथी शासनस्तरावर साजऱ्या करायच्या, हा निर्णय केवळ प्रशासकीय सोयीचा नसतो. तो राज्याच्या वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब असतो. त्यामुळेच हा निर्णय तांत्रिक म्हणून दुर्लक्षित करता येत नाही. जर संतपरंपरा आणि आधुनिक राष्ट्रनिर्मितीतील नेत्यांना वगळले जात असेल, तर मग कोणत्या मूल्यांना प्राधान्य दिले जात आहे? हा प्रश्न उभा राहतो. शासन हे सर्वसमावेशक असते की निवडक स्मृतींवर उभे राहते, याची चाचणी अशाच निर्णयांतून होते.

इतिहास हा केवळ पुस्तकांत नसतो; तो स्मरणोत्सवांत, सार्वजनिक कार्यक्रमांत आणि सामूहिक साजरीकरणात जिवंत राहतो. ज्या क्षणी शासन पातळीवर एखाद्या व्यक्तीचे स्मरण थांबते, त्या क्षणी हळूहळू तिचे विचारही बाजूला पडण्याचा धोका निर्माण होतो. संत तुकाराम-ज्ञानेश्वर किंवा राजीव गांधी यांना वगळणे म्हणजे फक्त नावांची कपात नव्हे, तर विचारांची कपात आहे. महाराष्ट्र म्हणजे केवळ भौगोलिक राज्य नव्हे; तो संत-समता-सुधारणांचा प्रदेश आहे. जर याच परंपरेला शासन निर्णयातून दुय्यम स्थान दिले गेले, तर उद्या फुले, शाहू, आंबेडकर यांच्याबाबतही असेच होणार नाही, याची खात्री कोण देणार? हा प्रश्न भावनिक नसून राज्याच्या आत्म्याशी संबंधित आहे.

२०२६ च्या शासन निर्णयाने एक स्पष्ट गरज अधोरेखित केली आहे, इतिहास, संस्कृती आणि राष्ट्रनिर्मिती यांचा समतोल राखणारे निर्णय घेण्याची. कोणालाही वगळून, कुणाला प्राधान्य देऊन समाज एकसंध राहत नाही. संतपरंपरा आणि आधुनिक नेतृत्व हे विरोधी नाहीत; ते एकाच भारतीय प्रवासाचे वेगवेगळे टप्पे आहेत. त्यांना वेगळे करण्याचा प्रयत्न म्हणजे भारताच्या समावेशक आत्म्यालाच धक्का देणे होय. शासनाने हा निर्णय पुनर्विचारात घ्यावा, ही केवळ मागणी नाही; ती लोकशाहीची अपेक्षा आहे. कारण राष्ट्र उभे राहते ते केवळ भविष्यातील स्वप्नांवर नाही, तर जपलेल्या स्मृतींवर. महाराष्ट्राची ओळख ही केवळ सत्तेच्या निर्णयांनी घडलेली नाही; ती संतांच्या अभंगांनी, विचारवंतांच्या लेखणीतून आणि राष्ट्रउभारणीत योगदान देणाऱ्या नेत्यांच्या दूरदृष्टीतून घडलेली आहे. त्या स्मृती जपणे ही कोणाची मक्तेदारी नाही, तर शासनाची घटनात्मक आणि नैतिक जबाबदारी आहे.

जगतगुरू संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि राजीव गांधी यांची जयंती-पुण्यतिथी शासन निर्णयातून वगळणे हा केवळ प्रशासकीय बदल नसून, सामूहिक स्मृती पुसण्याचा धोकादायक प्रयत्न ठरू शकतो. आज जर हे स्वीकारले, तर उद्या कोणाचे नाव यादीतून गळेल याची शाश्वती कोण देणार? शासनाने तात्काळ या निर्णयाचा पुनर्विचार करावा. स्मरणोत्सव ही औपचारिकता नाही; ती पिढ्यांना मूल्यांची ओळख करून देणारी शाळा असते. संतांचा विवेक, समाजसुधारकांचा मानवतावाद आणि आधुनिक राष्ट्रनिर्मात्यांची दूरदृष्टी, या तिन्ही प्रवाहांशिवाय महाराष्ट्र अपूर्ण आहे. आज गरज आहे ती विभाजनाच्या नव्हे, तर समावेशनाच्या निर्णयांची. सत्तेच्या बदलत्या समीकरणांपेक्षा समाजाच्या दीर्घकालीन आत्म्याला प्राधान्य देण्याची. कारण स्मृती जपणारेच राष्ट्र घडवतात आणि स्मृती पुसणारे इतिहासाच्या कठड्यावर उभे राहतात. शासनाने हे लक्षात ठेवावे की, संत, राष्ट्रपुरुष आणि विचारवंत यांना वगळून नव्हे, तर त्यांना सन्मान देऊनच लोकशाही मजबूत होते.

**प्रवीण वागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

## महाराणा प्रताप शौर्य आणि पराक्रमाचे प्रतिक- प्राचार्य डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड



केज/प्रतिनिधी.-स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी महाराणा प्रताप यांची पुण्यतिथी व्याख्यान आणि ग्रंथप्रदर्शन घेवून साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.

त्यानंतर एस. के. वैरागे यांचे थोडक्यात व्याख्यान घेण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून माजी ग्रा.पं. सदस्य रमेशराव गायकवाड, रमेश शेषेराव गायकवाड यशराज जाधव, शिवराज जाधव यांची उपस्थिती होती.

अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य, डॉ. वसुदेव गायकवाड हे होते.

अध्यक्षीय समारोप करताना महाराणा प्रताप हे शौर्य व पराक्रमाचे प्रतिक होत असे प्रतिपादन डॉ. वसुदेव गायकवाड यांनी केले.

त्यानंतर ग्रंथप्रदर्शनानही मोठ्या संख्येने वाचक, हितचिंतक, विद्यार्थी, युवक, जेष्ठ नागरीक यांनी प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद गायकवाड यांनी केले.

## एकुर्गा येथील माजी सरपंच दिनकर इंगळे, अडसूळ यांचा,आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात भाजपात जाहीर प्रवेश



लातूर - लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामांना प्रेरित होऊन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून लातूर तालुक्यातील मौजे एकुर्गा येथील माजी सरपंच दिनकर इंगळे बालकृष्ण अडसूळ यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत सोमवार रोजी भारतीय जनता पार्टीत अनेकांनी जाहीर प्रवेश केला. या प्रसंगी लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष बन्सी भिसे, लालासाहेब पाटील, विजय काळे, सुनील पाटील, लक्ष्मीकांत घुटे, दत्ता सप्काळ, राम गाडे, ॲड. धनराज शिंदे, बालाजी गवळी यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थित होती.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड हे संपूर्ण मतदार संघाला विकासाच्या दिशेने घेऊन जात आहेत. त्यांच्या माध्यमातून मतदार संघातील गावागावात वाडीवस्तीत विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला. या निधीतून होत असलेल्या विकास कामांना प्रेरित होऊन लातूर तालुक्यातील मौजे एकुर्गा येथील माजी सरपंच दिनकर इंगळे, माजी ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब रोडके, अमर इंगळे, तानाजी शिंदे, शत्रुघ्न गोरडे, संजय मोरे, प्रभावती इंगळे आणि बालकृष्ण अडसूळ यांच्यासह अनेकांनी भाजपा जाहीर प्रवेश केला.

भारतीय जनता पार्टीत प्रवेश केलेल्या प्रत्येकांना सन्मानाची वागणूक दिली जाईल असे सांगून यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत भाजपाच्या उमेदवारांना मताधिक्याने विजयी करण्यासाठी सर्वांनी मेहनत घ्यावी असे आवाहन केले.

# टाकळी येथे खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते विविध विकास कामांचे उद्घाटन संपन्न

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील टाकळी येथे खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते विविध विकास कामांचे उद्घाटन संपन्न झाले आहे.चिंचोली माळी सर्कल मुळेच मी आज खासदार आहे असे खा.बजरंग सोनवणे यांनी बोलताना मत व्यक्त केले.

खा. बजरंग सोनवणे यांनी टाकळी येथील टाकळी ते पाचीअंबा वस्ती रोड, गाव अंतर्गत स्मशान भूमी, दलित वस्ती येथे अंगणवाडी खोली बांधकाम, गावासाठी पाणी फिल्टर, टाकळी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत कदमवाडी येथे अंगणवाडी खोली बांधकाम, गावासाठी २४ तास गावठाण लाईट फिटर, आजार लवण तलाव येथे नवीन थ्री फेज रोहित (डी.पी.), लक्ष्मी आई मंदिर येथे सभामंडप बांधकाम करणे, मैनाजीची वस्ती कडे जाणारा सिमेंट रस्ता बनवणे, केज ते धनवाडा (भगवान बाबा वस्ती) रस्ता मजबुती व खडीकरण यासह विविध विकास कामांसाठी खा. बजरंग सोनवणे यांच्या प्रयत्नतून टाकळी ग्रामपंचायतला उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून खा. बजरंग सोनवणे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पंचायत समितीचे सदस्य दत्तात्रय (पिंटू)ठोंबरे, प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच विलास (आप्पा) जोगदंड, सरपंच पंडित चाळक सर, सरपंच सुरज पटाईत, गटनेते भाऊसाहेब गुंड, नगरसेवक बालासाहेब जाधव, ग्रामपंचायत सदस्य नारायण राऊत, राष्ट्रवादीचे नेते सय्यद शरीफ, उपसरपंच बाळासाहेब सावंत, गणेश



सावंत, महिला आघाडीच्या केज तालुका अध्यक्ष शितल लांडगे, आंधळेवाडीचे उपसरपंच सदाशिव आंधळे, सहदेव आंधळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांचे टाकळी ग्रामपंचायतच्या वतीने शाल,पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनंतकुमार घुले यांनी केले. प्रास्ताविकात घुले म्हणाले की, आमच्या टाकळी गावचा विकास करण्यासाठी व नागरिकांना शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी खा. बजरंग बप्पा सोनवणे यांचा मोठा सिंहाचा वाटा आहे बप्पा मुळेच आम्ही गावाचा विकास करू शकलो. आमचे वडील कै. नारायण बप्पा घुले यांनी दिलेली शिकवण व त्यांचा वारसा घेऊनच आम्ही गावाची प्रामाणिकपणे सेवा करत आलो आहोत यापुढेही प्रामाणिकपणे सेवा करणार आहोत.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी कै. नारायण बप्पा घुले यांच्या आठवणींना उजाळा देत, आनंतकुमार घुले सर, व युवा नेते श्रीकांत घुले यांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून टाकळी गावच्या विविध विकास कामासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून गावचा विकास करत आहेत त्याबद्दल दोन्ही बंधूचे कौतुक केले.

याप्रसंगी बोलताना खा. बजरंग सोनवणे म्हणाले की, टाकळी गावासह चिंचोली माळी सर्कलमध्ये मला आज पर्यंत मोठी ताकद दिली म्हणून तर आज मी खासदार आहे. यापुढे टाकळी गावाच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. अनंतकुमार घुले सर व श्रीकांत घुले यांना गावाच्या विकास कामासाठी कुठेही मी कमी पडणार नाही. पुढे बोलताना सोनवणे म्हणाले की, कै. नारायण (बप्पा) घुले यांना मी लक्ष्मी आई मंदिराच्या सभामंडपाच्या कामासाठी दिलेला शब्द आज पूर्ण करत आहे.कै. नारायण (बप्पाचे) व माझे पूर्वीपासूनचे ऋण बंधनाचे संबंध होते ते मी आज रोजी प्रामाणिकपणे जपण्याचे काम करत आहे.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य विक्रम घुले, उपसरपंच बन्सी बारगजे, ग्रामपंचायत सदस्या श्रीमती मीराताई शिरसट, ग्रामपंचायत सदस्य अरुण (बप्पा) घुले, मुकदम रघुनाथ बारगजे, मुकदम गोरख बारगजे, संपत (अण्णा) घुले, बाबासाहेब विठ्ठल मस्के, नरहरी कदम, मंगेश कदम, नितीन कदम यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, युवक, नागरिक आणि पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्र्वर मध्ये महात्मा बसवेश्र्वर व्याख्यानमालेचे २१, २२, २३ जानेवारी यादरम्यान आयोजन

लातूर-येथील महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात प्रतिवर्षाप्रमाणे दिनांक २१ जानेवारी ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत महात्मा बसवेश्र्वर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

महाविद्यालयाच्या विद्यार्थी अभ्यासिकेत दररोज दुपारी ४:०० वाजता ही व्याख्यानमाला संपन्न होणार असून याचे उद्घाटन समारंभ बुधवार दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांच्या अध्यक्षतेखाली व शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांच्या शुभहस्ते उद्घाटन होणार आहे. महाराष्ट्रातील ख्यातनाम वक्ते तथा संवाद तज्ज्ञ प्रा.डॉ विश्र्वाधार देशमुख हे भूतां परस्परे जडो, मैत्र जीवांचे या विषयावर पहिले पुष्प गुंफणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसे चिंचोलीकर, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर हे उपस्थित राहणार आहेत.

२२ जानेवारी २०२६ रोजी दुसरे पुष्प शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांचे अध्यक्षतेखाली सुप्रसिद्ध कीर्तनकार व प्रवचनकार ज्ञानेश्र्वर बंडगर हे महात्मा बसवेश्र्वर आणि महाराष्ट्रातील संत परंपरा या विषयावर दुसरे पुष्प गुंफणार आहेत. या कार्यक्रमाला संस्थेचे कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे ,संचालक काशिनाथ साखरे, संचालक बाबुराव तरगुडे हे उपस्थित राहणार आहेत.

दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प शिक्षण संस्थेचे संचालक राजेश्र्वर बुके यांच्या अध्यक्षतेखाली सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अँड. रंजना पगार- गवांदे या समाज वास्तवाला भिडताना या विषयावर तिसरे विचारपुष्प गुंफणार आहेत. कार्यक्रमाला सहसचिव सुनीलआप्पा मिटकरी ,संचालक गुरूलिंग धाराशिवे, संचालक बस्वराज येरटे, संचालिका सौ.ललिताबाई पांढरे, संचालक राजेश्र्वर पाटील संचालक महेश हालगे हे उपस्थित राहणार आहेत.

महाविद्यालयाच्या गौरवशाली परंपरेत विगत ४५ वर्षापासून समाजप्रबोधनाचे व्रत घेऊन महात्मा बसवेश्र्वर व्याख्यानमाला अखंडपणे चालू आहे.

या व्याख्यानमालेच्या तीन दिवस चालणाऱ्या या व्याख्यानमालेत सहभागी व्हावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे ,मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.नितीन वाणी ,संयोजन समितीचे प्रमुख डॉ.रत्नाकर बेडगे सहसंयोजक प्रो.डॉ सिद्राम डोंगरगे,डॉ.मनोहर चपळे ,डॉ प्रमोद सराफे,प्रा. संगमेश्र्वर पानगावे,प्रा. व्यंकट दुडिले, प्रा डॉ.टी. घनश्यश्याम ,प्रा.कल्पना गिराम ,डॉ.अश्रि्वनी रोडे,प्रा. जयश्री पाटील,प्रा. अनिता घवले, प्रा किसनाथ कुडके, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, महादेव कोरे, सय्यद जलील, श्रीकृष्ण बडगिरे व शुभम बिराजदार यांनी केली आहे.

# अनाधिकृतपणे अंगणवाडी पाडणाऱ्या माथेफिरू विरुद्ध कारवाई करण्यात यावी-आश्रुबा खरात

केज/प्रतिनिधी-जीवाचीवाडी-तूकुचीवाडी-रानोबाचीवाडी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत रानोबाचीवाडी येथील अंगणवाडी अनाधिकृतपणे कोणतेही कायदेशीर परवानगी न घेता एका माथेफिरूनी पाडल्यामुळे त्याच्यावर शासकीय मालमत्तेचे नुकसान व कायद्याचा भंग केल्यानुसार तात्काळ आठ दिवसात कारवाई करण्यात यावी




अशी लेखी निवेदनाद्वारे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे केज तालुकाध्यक्ष आश्रुबा खरात यांनी केज पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्याकडे केली आहे. आठ दिवसांमध्ये संबंधितावर गुन्हे दाखल न केल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) पक्षाच्या वतीने बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा लेखी निवेदनाद्वारे प्रशासनाला खरात यांनी दिला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील रानोबाचीवाडी येथील अंगणवाडी ही मागील ३० वर्षापासून गावातील लोकांनी लोकवर्गणीतून चालू केलेले होते. सदरील इमारतीचे काम हे सन २०२४-२५ या वर्षी वित्त आयोगातून १ लाख ५० हजार रुपये खर्च करून डागडुगीचे काम हे जीवाचीवाडी ग्रुप ग्रामपंचायतच्या माध्यमातून करण्यात आलेले होते.

परंतु एका माथेफिरू व्यक्तीने मागील आठ दिवसापूर्वी कोणतीही परवानगी न घेता त्या अंगणवाडीची इमारत जमिनीधोस्त केलेली आहे. गावातील लोक हे सर्वसामान्य ऊसतोड मजूर आहेत, आज रोजी त्यांचे पाल्य हे उघड्यावर शाळेत बसलेले आहेत.

सदरील बाब ही आमच्या पक्षाच्या संपर्क कार्यालयात तक्रारीच्या माध्यमातून आलेले आहे.

तरी आठ दिवसांच्या आत त्या व्यक्तीवर फौजदारी गुन्हा दाखल करून त्या व्यक्तीस कायद्याचा व प्रशासनाचा धाक द्यावा अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

जर प्रशासनाने संबंधितावर आठ दिवसांमध्ये कारवाई न केल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाच्या वतीने पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा प्रशासनाला निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या निवेदनाच्या प्रती गटविकास अधिकारी,पंचायत समिती केज, पालकमंत्री बीड, जिल्हा अधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, उपविभागीय अधिकारी आंबेजोगाई, तहसीलदार केज, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे केज यांना दिले आहेत.

# उत्कृष्ट ग्रामरोजगार सहाय्यक पुरस्काराने अनिल घोडके यांचा सन्मान

केज/प्रतिनिधी.-केज तालुक्यातील चिंचोली माळीचे भूमिपुत्र अनिल घोडके यांचा उत्कृष्ट ग्रामरोजगार सहाय्यक पुरस्काराने बीड येथे एका कार्यक्रमात सन्मान करण्यात आला आहे.




याबाबतचे सविस्तर माहिती अशी की, बीड येथे ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेच्या वतीने जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या जिल्हास्तरीय मेळाव्यात ग्रामरोजगार संघटनेचे केस तालुका सचिव अनिल घोडके यांचा उत्कृष्ट ग्रामरोजगार सहाय्यक या कार्याची दखल घेऊन कार्य गौरव द्वितीय पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बीड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अनिरुद्ध सानप, संगणक ऑपरेटर संघटनेचे जिल्हाध्यक्ष आदिनाथ सानप, पीटीओ संघटनेचे जिल्हाध्यक्ष मेहत्रे, एपीओ संघटनेचे जिल्हाध्यक्ष आणि ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेचे जिल्हाध्यक्ष भाऊराव प्रभाळे, यशोगाथा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रसार आणि प्रचारक रवींद्र इंगोले, मराठवाडा प्रमुख सिद्धेश्वर खांडे, बीड तालुका अध्यक्ष मोहन कचरे, गेवराई तालुका अध्यक्ष आढाळे, आंबेजोगाई तालुका अध्यक्ष केंद्रे, केज तालुका अध्यक्ष विष्णू जाधव, वडवणी तालुका अध्यक्ष हवणे, केज तालुका उपाध्यक्ष गोविंद गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या मेळाव्यात जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली तर केस तालुक्यातून विष्णू जाधव, गोविंद गोरे यांना सदस्य म्हणून व जिल्हा सचिव अनिल घोडके यांची निवड करण्यात आली.

या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व रोजगार सहाय्यक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या निवडी करून त्यांना शाल, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. उत्कृष्ट ग्रामरोजगार सहाय्यक पुरस्काराने अनिल घोडके यांना मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# सत्तरीत पोचलेल्या शिष्यांनी, ऐंशीतील गुरुची केली पाद्यपूजा!

कोल्हापूर. : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, येथील सेवानिवृत्त भूगोल विभाग प्रमुख, प्रसिद्ध समाजसेवक, दानशूर , प्रा. डॉ. राम पणदूरकर यांचा ऐंशी वा वाढदिवस सांगलीतील हरिपूर बाग गणेश मंदिरात वेदोक्त ,शास्त्रोक्त पद्धतीने त्यांच्या, १९७७ ते १९७९ एम.ए.भूगोल, विद्यार्थ्यांनी पाद्य पूजा करून संपन्न केला.



त्यांचे बहुसंख्य विद्यार्थी, त्यांच्या कुटुंबीयांसोबत उपस्थित होते. पाद्यपूजेचे संयोजन केले, त्यांचे शिष्य निरूपणकार, श्री. शामकांत उमराणी यांनी तर गुरुची पाद्यपूजा करण्याचा मान सौ.व श्री नरसू वाघमोडे यांना मिळाला. स्वागत प्रा. दिलीप गायकवाड, तर पाद्यपूजेची माहिती श्री माधव जोशी यांनी दिली .

सौ.माई पणदूरकर यांचे हस्ते महिला विद्यार्थिनींना, संक्रांत वाण प्रदान केले .दुपारच्या सत्रात सातारचे,

सेवानिवृत्त प्राचार्य, डॉ. डी.जी गाताडे व उपस्थित शिष्यांनी

डॉ. पणदूरर यांची माझे जीवन गाणे या शीर्षकाखाली ८० प्रश्न विचारून सरांचा जीवनप्रवास उलगडला. भूगोल, कायदा ,राज्यशास्त्र सोबत लोकसेवा आयोगापर्यंत ज्ञानप्रसार केलेल्या सरांनी समर्पक उत्तरे दिली.

सारे काही देशाचे आहे, ज्या देशाने मला दिले त्यालाच मी परत दिले. असे ते म्हणाले. डॉ. पणदूरकर यांनी साठ लाख रुपये शिवाजी विद्यापीठास, पाच लाख राष्ट्रीय संरक्षण निधीसाठी व दहा लाख पंतप्रधान आपत्कालीन निधीसाठी गेल्या दोन वर्षात दिले. त्याचा उल्लेख या कार्यक्रमात झाला. देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, एके दिवशी घेणाऱ्याने देणाऱ्याचे हात घ्यावेत... अशी इच्छा पणदूरकर यांनी व्यक्त केली. शेवटी एक तास करमणुकीच्या कार्यक्रमात डॉ. पणदूरकर यांनी काही कविता सादर केल्या. इतर श्रोत्यांनी विविध कार्यक्रम सादर केले. सूत्रसंचालिका सुनंदा माने जाधव यांनी फिरकी घेणारे, प्रश्नातच उत्तर सापडणारे, चकवा प्रश्न विचारले.शेवटी सुनंदा माने यांनी आभार मानले आणि पसायदानाने कार्यक्रम संपन्न झाला.

सदर कार्यक्रमास जवळजवळ साठहून अधिक विद्यार्थी, त्यांचे कुटुंबीय व नातवंडे पण उपस्थित होती. श्री उमराणी गायकवाड, माधव जोशी, गाताडे, दळवे, काळे, जाधव, पाटील, पवार, वसमाने पाटील, शामराव पाटील, वाघमारे, वाघमोडे ,

अनुराधा मादनाईक ,अर्जुन वाघ, पोळ इत्यादी शिष्यांची प्रमुख उपस्थिती होती. सध्याच्या शिक्षकाला अतिरिक्त कामे लावून पालक व विद्यार्थ्यांकडून त्रास देणारी कृती करण्याच्या सध्याच्या पिढीने हा आदर्श आत्मसात करावा. आणि शिक्षकाला मान दयावा. असा संदेशही त्यांनी दिला.

असे कार्यक्रम फक्त आषाढ पौर्णिमेला न करता, सतत केल्यास समाजावर त्याचा अनुकूल परिणाम होऊ शकतो. श्री एकनाथ जाधव ,सुनंदा माने, माधव जोशी इत्यादींनी कार्यक्रमाचे संयोजन केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# बदलापुरात ऐतिहासिक भव्य धम्म परिषद संपन्न झाली.



विशेष प्रतिनिधी (सागर तायडे) बदलापूर :- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याची स्थापना होण्यासाठी झालेल्या लढाई अश्वाचा घोड्यांचा महत्वपूर्ण सहभाग होता.ते घोडे बदलण्याचे प्रसिद्ध ठिकाण म्हणून प्रसिद्ध असणारे गांव म्हणजेच बदलापूर. आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी बदलापूर येथे दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी गौरी मंगल कार्यालय मांजर्ली बदलापूर पश्चिम जिल्हा ठाणे येथे भव्य धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.त्याला प्रसिद्ध पूज्य भिख्खू संघ आणि ठाणे जिल्हा व मुंबईतील धम्म उपासक उपासिका यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.पूज्य भंते संघपाल (श्रमण शिक्षा अभियान) अध्यक्ष संघपाल धम्म लाईफ बुद्धिस्ट फाउंडेशन यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने बदलापूर येथे संपन्न झालेली भव्य धम्म परिषद विविध संस्था संघटना यांच्या पुढाकाराने शंभर टक्के यशस्वी झाली.त्यात विशेष पूज्य भंते करुणानंद महाथेरो, (दि ग्रेड हॅपिनेस यू ट्यूब चॅनल) धम्म परिषद अध्यक्ष,उद्घाटक पूज्य भंते डॉ.एन आनंद महास्थवीर,विशेष उपस्थिती पूज्य भंते विनाचार्य महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन, पूज्य भंते चांदीमा थेरो,पूज्य भंते यश थेरो श्रीलंका,पूज्य भंते ज्ञानरक्षित थेरो, पूज्य भंते गुणानंद अभिभू, पूज्य भंते धम्मानंद, पूज्य भिख्खुणी अभिन्ना, पूज्य भिख्खुणी सुनंदा बोधी, पूज्य भिख्खुणी बुद्ध कन्या आणि आदरणीय डॉ भिमराव यशवंतराव आंबेडकर राष्ट्रीय ट्रस्टी कार्याध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रमुख पाहुणे व अनेक मान्यवरांच्या उपस्थित पूज्य भंते संघकीर्ती महास्थवीर यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन चे प्रमुख पूज्य भंते विनाचार्य यांनी १२ फेब्रुवारी २०२६ रोजी रामलीला मैदान दिल्ली येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले. महाबोधी महाविहार हमारा स्वाभिमान आहे.ते मुक्त झाल्या शिवाय आम्ही गप्प बसणार नाही असे ते म्हणाले.भारतीय बौद्ध महासभा आणि अखिल भारतीय भिख्खू संघ एकत्र आला तर देशभरातील धम्म उपासक उपासीका महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाल्या शिवाय राहणार नाही.असे आदरणीय डॉ.भिमराव यशवंतराव आंबेडकर राष्ट्रीय ट्रस्टी कार्याध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा यांनी सांगितले.आदर्श समाज रचना करण्यासाठी श्रमण शिक्षा अभियानाची आवश्यकता लक्षात घेऊन भव्य धम्म परिषेद बदलापूर चे आयोजन करण्यात आले होते. असे श्रमण शिक्षा अभियान प्रमुख पूज्य भंते संघपाल मुख्य आयोजक यांनी सांगितले. संघपाल धम्म लाईफ बुद्धिस्ट फाउंडेशन आयोजित भव्य धम्म परिषेद बदलापूर मध्ये अखिल भारतीय भिख्खू संघ,भारतीय बौद्ध महासभा,बौद्धजन पंचायत समिती, त्यागमूर्ती फाउंडेशन,समता सैनिक दल,बहुजन विकास समिती,प्रबुद्ध सामाजिक सेवा संस्था,बारवी विपश्यना संस्था,धम्म साकच्छा समूह मुंबई,बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क,श्रद्धावान उपासक उपासीका संघ बदलापूर युथ रेजिमेंट यांचे विशेष सहयोग लाभले. त्यामुळेच भव्य धम्म परिषद संपन्न झाली.

पूज्य भंते संघपाल यांच्या मार्गदर्शनाखाली आयु.राहुल गायकवाड बौद्धाचार्य केंद्रीय शिक्षक भारतीय बौद्ध महासभा शाखा लुंबिनी बुद्ध विहार बॅरेज रोड बदलापूर यांच्या नेतृत्वाखाली,आयु. सुरेश नाना शिशुपाल ज्येष्ट सामाजिक मार्गदर्शक,आयु.आनंद सोनकांबळे सरचिटणीस बहुजन विकास समिती बदलापूर,आयु. जगजीवन बौद्ध भारतीय बौद्ध महासभा उतर प्रदेश प्रभारी,आयु. विद्याताई कांबळे हेंद्रपाडा- श्रावस्ती बुद्ध विहार, आयु.चंद्रहास तांबे- पाली भाषा बौद्ध साहित्य अभ्यासक,आयु.सुनील दुपटे सामाजिक कार्यकर्ते,आयु.राकेश यादव गुरुजी भारतीय बौद्ध महासभा शाखा लुंबिनी बुद्ध विहार बॅरेज रोड बदलापूर यांनी विशेष मेहनत घेतली.धम्म परिषेदेत बदलापूर शहराच्या आजूबाजूच्या नगरातील व गांवातील धम्म उपासक उपासीका बंधु भगिनीनी मोठ्या उत्सपूर्तपणे सहभाग घेतला. त्यामुळे बदलापूरची भव्य धम्म परिषद यशस्वी झाली.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.